ISSN 2278-8808
An International Peer Reviewed
SJIF 2013 = 4.194
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# अकोले तालुक्यातील आदिवासी बालकांमधील लिंग गुणोत्तराचा चिकित्सक अभ्यास

**वायळ नवनाथ लक्ष्मण**

*भूगोल विभाग, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे-४११००५.*

**Abstract**

*प्रस्तुत शोधनिबंधामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील आदिवासी बालकांमधील लिंग गुणोत्तर प्रमाणाचा अभ्यास केलेला आहे. आधुनिक काळात संपूर्ण भारतातील स्त्रीयांचे प्रमाण कमालीचे घटत चालल्याचे दिसून येते. पुरुष प्रधान संस्कृती व स्त्रीयांना समाजातील दुय्यम स्थान यामुळे स्त्री भ्रुणहत्येचे प्रमाण वाढत जाऊन स्त्री व पुरुष लिंग गुणोत्तराचा नैसर्गिक समतोल बिघडल्याचे दिसून येते. अकोले तालुका हा अहमदनगर जिल्ह्यातील डोंगराळ व शेतीप्रधान तालुका आहे. संपूर्ण भारतात आदिवासी लोकांमध्ये /अनुसूचित जमातींमध्ये स्त्री व पुरुषांचे लिंग गुणोत्तर प्रमाण इतर समाजापेक्षा जास्त आहे. मात्र गेल्या काही दशकांमध्ये आदिवासी लोकांमधील बालकांच्या लिंग गुणोत्तरात सातत्याने घट होताना दिसून येत आहे. लिंग गुणोत्तरात होणारी लक्षणीय घट कुटुंबव्यवस्थेला व समाज व्यवस्थेला हानिकारक आहे, लिंग गुणोत्तराचा समतोल टिकवण्यासाठी वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्या दृष्ठीने काही कारणे शोध्याण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून करण्यात आला आहे.*

*बीजसंज्ञा : स्त्री-पुरुष प्रमाण, लिंग गुणोत्तर,आदिवासी जमाती, स्थान मानांक, लोकसंख्या*

**प्रस्तावना :**

भारतात २०११ च्या जनगणनेनुसार ५५० आदिवासी जमाती आहेत. जगात सर्वात जास्त आदिवासी जमातींची लोकसंख्या भारतात (१०.४ कोटी) असून या जमाती आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या आहेत. सध्य स्थितीला सरकारकडून या जमातींच्या विकासासाठी सर्वांगीण प्रयत्न केले जात असले तरी या जमाती अजुनही विकासाच्या मानक मापदंडापासून खूप दूर आहेत. या जमातींचा मानववंश शास्त्रीय, लोकसंख्या शास्त्रीय, भौगोलिक, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अभ्यास होणे गरजेचा असून त्याद्वारे या जमातींना सामाजिक विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले जाऊ शकते. लोकसंखेच्या अभ्यासातील अनेक पैलुंपैकी लिंग गुणोत्तर प्रमाणाचा अभ्यास हा आदिवासी जमातींचा

समाजातील लोकसंख्या शास्त्रीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक स्थान तसेच, प्रादेशिक विकासातिक योगदान समजण्यासाठी महत्वाचा ठरू शकतो.

लिंग गुणोत्तर हे लोकसंख्या रचनेचे महत्वाचे वैशिष्ट्ये आहे. ज्यामुळे लोकसंख्या वितरणाचे स्वरूप आणि स्त्री-पुरुष प्रमाण समजू शकते. लिंग रचनेच्या अभ्यासाठी लिंग गुणोत्तर काढणे आवश्यक असते. एखाद्या भौगोलिक प्रदेशातील स्त्रीयांचे दर हजार पुरुषांमागे असणारे प्रमाण/गुणोत्तर म्हणजे लिंग गुणोत्तर होय. लिंग गुणोत्तराचा समाजातील वैवाहिक स्थितीचे प्रमाण, मजूर पुरवठा, जनन व स्थलांतरावर प्रत्यक्ष परिणाम होतो, तर साक्षरता, जन्मदर, मृत्युदर यांवर अप्रत्यक्ष परिणाम होतो. लिंग गुणोत्तर हा एखाद्या प्रदेशातील सामाजिक व आर्थिक स्थिती दर्शवणारा आरसा असतो(गिल १९८१). लिंग गुणोत्तर हे प्रादेशिक विश्लेषणातील महत्वाचा घटक असून त्यामुळे प्रदेशाची सामाजिक व आर्थिक स्थिती निर्देशित होते. सिंग (२००३), लक्षमन (२००६), झोडगे (२००८), रॉय (२००८) नायक (२०१०) यांनी ग्रामीण भारताच्या विविध प्रदेशातील सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास व अवलोकन करण्यासाठी लिंग गुणोत्तराचा प्रभावी वापर कलेला आहे. भारतात २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासी लोकसंख्येतील लिंग गुणोत्तराचे प्रमाण (१००० पुरुषांमागे ९९० स्त्रिया) राष्ट्रीय प्रमाणापेक्षा (९४०) जास्त आहे, तसेच भारतात आदिवासी बालकांतील लिंग गुणोत्तर ९५७आहे. हे प्रमाण जरी सामान्य लिंग गुणोत्तरापेक्षा जास्त असले तरी ते वेगाने कमी होत असून त्यामुळे आदिवासी भागातील समस्या अधिक गंभीर होऊ शकतात. अकोले तालुक्यात आदिवासी जमातीची लोकसंख्या ४३.३२ % आहे. अकोले तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येच्या सामाजिक व आर्थिक नियमनासाठी आदिवासी बालकांतील लिंग गुणोत्तराचा अभ्यास होणे महत्वाचा आहे. यासाठी १९९१ ते २०११ च्या जनगणनेंच्या माहितीच्या आधारे अकोले तालुक्यातील आदिवासी बालकांतील लिंग गुणोत्तराची आकडेवारी गोळा केलेली आहे.

**अभ्यास क्षेत्र:**

पश्चिम महाराष्ट्रातील घाट माथ्यावर अहमदनगर जिल्हयाच्या पश्चिमेला सहयाद्री पर्वतरांगांमध्ये वसलेला अकोले तालुका विविध भौगोलिक वैशिष्ट्यांनी समृद्ध आहे. या तालुक्यास संपन्न ऐतिहासिक व भौगोलिक वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्रात जैव-विविधता असलेली अनेक ठिकाणे आहेत, त्यापैकी एक ठिकाण म्हणजे अहमदनगर जिल्हयातील अकोले तालुका. या तालुक्याची ओळख आदिवासी व डोंगरी तालुका अशी आहे. तालुक्यातील लोकांचे उपजीविकेचे प्रमुख साधन शेती असून शेती व्यतिरिक्त इतर आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत् निर्माण झालेले नाहीत. मात्र तालुक्यातील लोकसंख्येत काळाप्रमाणे वाढ झालेली असून लोकसंख्या रचनेत अमुलाग्र बदल झाल्याचे दिसते. अकोले तालुका आदिवासी बहुल असून या तालुक्यात आदिवासी लोकसंख्येतील स्त्री पुरुष लिंग गुणोत्तरात मागील काही वर्षात किंचीत घट झाल्याचे दिसते, तर आदिवासी बालकांमध्ये लिंग गुणोत्तराच्या प्रमाणात कमालीची घट झाल्याचे दिसून येत आहे. बालक लिंग गुणोत्तरात झालेली घट अस्वस्थ करणारी आहे. समाजाची निकोप वाढ होण्यासाठी समाजातील स्त्री-पुरुषांचे प्रमाण योग्य असण्याची गरज आहे.

**स्थान व विस्तार :** अहमदनगर जिल्हयामध्ये एकूण चौदा तालुक्यांपैकी अकोले तालुका जिल्हयाच्या पश्चिमेकडील सहयाद्रीच्या डोंगराळ भागामध्ये वसलेला आहे. अकोले तालुक्याचा भौगोलिक विस्तार १९° १५′ उत्तर ते १९° ४५′ उत्तर अक्षवृत्त व ७३° ३६′ पूर्व ते ७४° ०६′ पूर्व रेखावृत्त असा आहे. तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ १५०९.८९ चौ. कि.मी. असून तालुक्यातील एकूण गावांची संख्या १९१ आहे. तालुक्याची एकूण लोकसंख्या २९१९५० असून त्यांमध्ये पुरषांची संख्या १४७८८० तर स्त्रीयांची संख्या १४४१७० आहे. तालुक्याचे सामान्य लिंग गुणोत्तर प्रमाण ९६८ आहे. अकोले तालुक्यात आदिवासींची एकूण लोकसंख्या १३९७३० असून त्यामध्ये ७०३२७ पुरुष तर ६९४०३ स्त्रीया आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार अकोले तालुक्यात आदिवासी लोकांचे प्रमाण ४३.३२ टक्के आहे. अकोले तालुका सहयाद्री पर्वताच्या पूर्व उतारावर वसलेला आहे. पूर्वेकडून जसजसे पश्चिमेकडे जावे तसतसे तालुक्याची

समुद्र सपाटीपासूनची उंची वाढत जाते. अकोले तालुक्याचा उत्तर बाजूस नाशिक जिल्ह्याची सीमा आहे, पश्चिमेस ठाणे जिल्ह्याची सीमा तर दक्षिणेस पुणे जिल्ह्याची सीमा आहे. पूर्व बाजूस अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्याची सीमा आहे. महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसुबाई हे अकोले तालुक्यातच असून रतनगड, हरिश्चंद्रगड, पट्टाकिल्ला हे महत्वाचे गडकिल्ले आहेत. या तालुक्यात गोदावरीच्या उपनद्या असलेल्या प्रवरा, मुळा व आढळा या नद्यांचा उगम होतो. भंडारदरा व निळवंडे ही महत्वाची धरणे असून इतर अनेक मध्यम व लघु प्रकल्प आहेत.

**अभ्यास उद्दिष्ट्ये :**

१. अकोले तालुक्यातील आदिवासी बालकांच्या लिंग गुणोत्तराचा अभ्यास करणे.

२. तालुक्यातील आदिवासी बालकांच्या लिंग गुणोत्तराची वाढ किंवा घट याचा आढावा घेणे.

**अभ्यास पद्धती :**

सदर संशोधन द्वितीयक माहितीवर आधारित असून सदर माहिती जिल्हा जनगणना व राज्य जनगणना अहवाल, विविध संदर्भ पुस्तके आणि ग्रंथांच्या माध्यमातून गोळा केलेली आहे. या माहितीवर सांख्यिकी तंत्राचा वापर करून विश्लेषण व निष्कर्ष काढण्यात आले आहेत. त्याचबरोबर निरीक्षण व ग्रंथालयीन पद्धतीचाही वापर करण्यात आला आहे. नकाशा निर्मिती साठी संगणकाचा तसेच भौगोलिक माहिती प्रणालीचा प्रभावी उपयोग करण्यात आला आहे. संशोधनात १९९१ ते २०११ हा वीस वर्षांचा कालावधी अभ्यासासाठी घेण्यात आलेला आहे. तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येचे केंद्रीकरण शोधण्यासाठी स्थान मानांक पद्धतीचा अवलंब केला आहे.

**अभ्यस सूत्र:**

१. स्थान मानांक =

२. आदिवासी बालकांमधील लिंग गुणोत्तर =

प्रस्तुत शोध निबंधामध्ये आकडेवारीचे वर्गीकरण करण्यासाठी वरील सूत्रांचा वापर करण्या आलेला आहे.

**विषय विवेचन :**

**आदिवासी बालकांतील लिंग गुणोत्तरातील बदल (१९९१ ते २०११):**

**सारणी क्र.१ वरून असे दिसते की, भारतातील आदिवासी बालकांतील लिंग गुणोत्तर प्रमाण देश, राज्य, जिल्हा आणि तालुका पातळीवर मागील वीस वर्षात कमी होत गेलेले आहे. भारतात १९९१ मध्ये आदिवासी बालकांतील लिंग गुणोत्तर ९८५ होते ते २०११ मध्ये ९५७ पर्यंत खाली आलेले आहे. राष्ट्रीय स्तरावर सुद्धा आदिवासी बालकांमधील लिंग गुणोत्तराचे प्रमाण कमालीचे घटलेले आहे. महाराष्ट्रात राज्यस्तरावर आणि अहमदनगर जिल्ह्यात सुद्धा आदिवासी बालक लिंग गुणोत्तर प्रमाण घटलेले दिसून येते. अकोले तालुक्यातील आदिवासी बालकांच्या लिंग गुणोत्तर आकडेवारीवरून असे दिसतेकी मागील वीस वर्षात बालाकांच्या लिंग गुणोत्तरात खूपच घट झालेली आहे. १९९१ मध्ये अकोले तालुक्यात बालक लिंग गुणोत्तर प्रमाण १००९ होते. ते २००१ मध्ये ९६४ पर्यंत कमी झाले, तर २०११ पर्यंत ९४१ पर्यंत घटले. आदिवासी बालकांतील मुलींच्या प्रमाणात होणारी घट सामाजिक असमतोल निर्माण करणारी आहे.**

**सारणी क्र.१. १९९१ ते २०११ या कालावधीतील आदिवासी बालकांतील लिंग गुणोत्तर प्रमाण**

| **जनगणना वर्ष** | भारत | महाराष्ट्र | अहमदनगर | अकोले |
|---|---|---|---|---|
| १९९१ | ९८५ | ९८२ | ९७४ | १००९ |
| २००१ | ९७२ | ९६५ | ९६४ | ९६४ |
| २०११ | ९५७ | ९५५ | ९५२ | ९४१ |

**स्त्रोत: जिल्हा जनगणना व राज्य जनगणना अहवाल १९९१ ते २०११,**


**भारतातील अनुसूचित जमातींचा संख्यिकी अहवाल**

**अकोले तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येचे केंद्रीकरण :**

**अकोले तालुक्यात २०१११ च्या जनगणनेनुसार एकून २९१९५० लोकसंख्येपैकी १३९७३० लोकसंख्या आदिवासी जमातींची असून, त्यामध्ये ७०३२७ पुरुष तर ६९४०३ स्त्रियांची संख्या आहे.अकोले तालुक्यात कोळी महादेव या जमातीची लोकसंख्या सर्वाधिक आहे, तर अल्प प्रमाणात ठाकर व कातकरी या जमातींची लोकसंख्या आढळते. आदिवासी जमातीतील लोकसंख्या वितरणावर**

**भौगोलिक घटकांचा प्रभाव आहे.अकोले तालुक्यात आदिवासी लोकसंख्येचे वितरण असमान स्वरुपात झालेले असून त्यांचे केंद्रीकरण पश्चिम भागात झालेले आहे. अकोले तालुक्यात १९१ गावे आहेत. त्यापैकी ९९ टक्के पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेली २१ गावे आहेत. या गावांचा स्थान मानांक २.०५ पेक्षा जास्त म्हणजेच अति उच्च आहे. तसेच ७७ गावांमध्ये स्थान मानांक उच्च (१.५४ ते २.०५) आहे (आकृती क्र.१). या सर्व गावांमध्ये आदिवासी लोकसंख्या जास्त असून ही सर्व गावे अकोले तालुक्यातील पश्चिम भागात सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये वसलेली आहेत. या आदिवासी क्षेत्रात कोळी महादेव या जमातीचे प्राबल्य असून महाराष्ट्रीतील मध्य सह्याद्री पर्वतरांगांमध्ये या जमातीचे वास्तव्य स्थान आहे. कोळी महादेव जमाती बरोबरच ठाकर या जमातीचेही अल्प प्रमाणात वास्तव्य पश्चिम अकोले विभागात पहावयास मिळते. १९१ पैकी २२ गावांमध्ये मध्यम प्रमाणात आदिवासी लोकसंख्या आहे. तालुक्यात २० गावांमध्ये अल्प तर ५१ गावांमध्ये अत्यल्प प्रमाणात आदिवासी लोकसंख्या आहे. अल्प लोकसंख्येची गावे पूर्व अकोले विभागात वसलेले आहेत. आदिवासी लोकसंख्येच्या वितरणानुसार तालुक्यात स्पष्ट पणे दोन विभाग दिसून येतात, पूर्व व पश्चिम विभाग. त्यापैकी पश्चिम विभागात आदिवासी लोकसंख्येचे केंद्रीकरण झालेले आहे तर पूर्व विभागात इतर प्रवर्गातील लोकसंख्या जास्त प्रमाणात आढळते.**

**अकोले तालुक्यातील आदिवासी बलाकांमधील लिंग गुणोत्ताराचा सखोल अभ्यास करण्यासाठी व लिंग गुणोत्तराचा काल अभ्यासण्यासाठी तालुक्यातील निवडक गावांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. सदर संशोधनासाठी अकोले तालुक्यातील पश्चिम विभागातील अशी गावे निवडण्यात आलेली आहेत की ज्या गावांमध्ये ९९ टक्के पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या आहे. या गावांतील बालक लिंग गुणोत्तराचा अभ्यास केलेला आहे.**




**आकृती क्र. १: अकोले तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येचे केंद्रीकरण**

**आदिवासी बालकांतील लिंग गुणोत्तर :**

**अकोले तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येच्या केंद्रीकरणाच्या स्थान मानांकावरून असे दिसते की, तालुक्याच्या पश्चिम भागात आदिवासी लोकसंख्येचे केंद्रीकरण झालेले आहे. २०११ च्या जनगणनेनुसार २.० पेक्षा जास्त स्थान मानांक असलेल्या गावांमध्ये ९० टक्के पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या आहे. त्यातील २.०५ पेक्षा जास्त स्थान मानांक असलेल्या म्हणजेच ९९ टक्के पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेली १९१ पैकी २१ गावे अभ्यासासाठी निवडलेली आहेत. या गावांमधील बालक लिंग गुणोत्तराचा अभ्यास करण्यात आला आहे.**

**१९९१ मधील लिंग गुणोत्तर: १९९१ च्या जनगणनेनुसार अकोले तालुक्यात आदिवासी बालक लिंग गुणोत्तरचे प्रमाण जास्त दिसून येते. निवडलेल्या २१ गावांपैकी १२ गावांमध्ये आदिवासी बालकांचे लिंग गुणोत्तर प्रमाण १००० पेक्षा जास्त आहे. म्हणजेच ५० टक्के पेक्षा जास्त गावांमध्ये आदिवासी बालकांमध्ये मुलींचे प्रमाण जास्त आहे. सर्वात जास्त मुलींचे प्रमाण शिरपुंजे बु. (१५००) गावामध्ये आहे. त्या नंतर खडकी बु. (१३१४), दगडवाडी (१२१२), सोमलवाडी (१२०८), रंधा बु. (११७६) इ. गावांमध्ये**

**मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण जास्त दिसून येते. सर्वात कमी प्रमाण डोंगरवाडी (७५५), बिताका (७९४), कोकणवाडी (८००) इ. गावांमध्ये दिसून येते. काही गावांमध्ये कमी लिंग गुणोत्तर दिसत असले तरी सरासरी १९९१ मध्ये लिंग गुणोत्तर १०४४ आहे.**

**२००१मधील लिंग गुणोत्तर: १९९१ च्या आकडेवारीच्या तुलनेत २००१ मध्ये आदिवासी बालकांच्या लिंग गुणोत्तरात थोडी घट झाल्याचे दिसून येते. १००० पेक्षा जास्त गुणोत्तर असलेल्या गावांच्या संखेत घट झालेली आहे. २०११ मध्ये फक्त ८ गावांमध्ये मुलींचे प्रमाण मुलांपेक्षा जास्त आहे. यामध्ये उंबरवाडी (१३७५), एकदरे (१३५६), गोडेवादी (१३२०), पाचनई (१२०४), कोहने (११६७) इ. गावांमध्ये लिंग गुणोत्तर जास्त आहे. मात्र २१ गावांपैकी १३ गावांमध्ये आदिवासी बालक लिंग गुणोत्तर १००० पेक्षा कमी आह. त्यामध्ये सोमलवाडी (७१४), डोंगरवाडी (७८४), पेढेवाडी (७८३) इ. या गावांमध्ये मुलींच्या प्रमाणात लक्षनिय घट झाल्याचे दिसून येते. तसेच आदिवासी बालकांच्या लिंग गुणोत्तराची सरासरीत ९९९ पर्यंत घटलेली आहे. १९९१ च्या तुलनेत मुलींचे प्रमाण ४५ ने कमी झालेले आहे.**

| अ.क्र. | गावे | **आदिवासी बलाकांतील लिंग गुणोत्तर प्रमाण** | | |
|---|---|---|---|---|
| | | १९९१ | २००१ | २०११ |
| १ | **डोंगरवाडी** | ७५५ | ७८४ | ६८२ |
| २ | **रतनवाडी** | ११०९ | ८३१ | ९१५ |
| ३ | रंधा बु. | ११७६ | ८५६ | १०३० |
| ४ | केळुंगण | ११०७ | ८५६ | ९८९ |
| ५ | **शिरपुंजे खु.** | १५०० | १०९४ | १२५९ |
| ६ | **खडकी बु.** | १३१४ | ९६९ | १५१७ |
| ७ | पाचनई | ९८४ | १२०४ | ९१७ |
| ८ | **पाचपट्टावाडी** | ८५४ | ८४८ | ११६३ |
| ९ | **पेढेवाडी** | ८०९ | ७८३ | ७९६ |
| १० | **कोकणवाडी** | ८०० | ९०९ | ८७२ |
| ११ | एकदरे | १०९० | १३५६ | ८१७ |
| १२ | बिताका | ७९४ | ११९० | १२१४ |
| १३ | **पिंपळदरावाडी** | ९७६ | ८१० | ९८३ |
| १४ | **दगडवाडी** | १२१२ | ९८८ | ८८७ |
| १५ | **पोपेरेवाडी** | १०४८ | ८६४ | ९६७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | कोथळे | १००० | ११६७ | ८४२ |
| १७ | **शिंदे** | ११५४ | ११६७ | ११५४ |
| १८ | **सोमलवाडी** | १२०६ | ७४४ | ९६० |
| १९ | **उंबरवाडी** | ११०८ | १३७५ | ५९३ |
| २० | गोडेवाडी | ८४७ | १३१० | ८२७ |
| २१ | **गारवाडी** | १०८३ | ८९७ | ७६५ |
| | **सरासरी** | १०४४ | ९९९ | ९५९ |

**२०११ मधील लिंग गुणोत्तर: २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासी बालक लिंग गुणोत्तरात अधिक घट झालेली आहे. २०११ मध्ये अकोले तालुक्यात आदिवासी गावांमध्ये बालक लिंग गुणोत्तर प्रमाण १००० पेक्षा जास्त असलेली गावांची संख्या फक्त सहा राहिलेली असून त्यामध्ये खडकी बु. (१५१७), शिरपुंजे खु. (१२५९), बिताका (१२१४), शिंदे (११५४) इ. गावांमध्ये मुलींचे प्रमाण जास्त आहे. तर, २१ पैकी १५ गावांमध्ये बालक लिंग गुणोत्तर प्रमाण १००० पेक्षा कमी दिसून येते. त्यामध्ये उंबरवाडी (५९३), डोंगरवाडी (६८२), गारवाडी (७६५) इ या गावांमध्ये मुलींच्या प्रमाणात लक्षणीय घट झालेली आहे. २०११ मध्ये आदिवासी बालक लिंग गुणोत्तर सरासरी ९५९ पर्यंत घटलेली आहे.**

**१९९१ पासून २०११ पर्यंत आदिवासी बालक लिंग गुणोत्तरात सातत्याने घट झालेली दिसून येत आहे. मागील वीस वर्षात हे प्रमाण ८५ ने घटलेले आहे. आदिवासी बालकांच्या लिंग गुणोत्तरात होणारी घट चिंताजनक असून असेच घट होत राहिल्यास अनेक सामाजिक समस्या निर्माण होऊ शकतात.**

**निष्कर्ष:**

**अकोले तालुक्यात अभ्यासासाठी निवडलेल्या गावांतील आदिवासी बालकांतील लिंग गुणोत्तरात अंशत: चढ-उतार पहावयास मिळतो. मात्र १९९१ पासून २०११ पर्यंत बालक लिंग गुणोत्तर प्रमाणाचा काल सातत्याने घटलेला आहे. अकोले तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागात वैद्यकीय सुविधा व दवाखाने नाममात्र आहेत. त्यामुळे वैद्यकीय सुविधांचा दुरुपयोग होऊन लिंग गुणोत्तर घटलेले नाही. मात्र दुर्गम प्रदेशातील आदिवासींमध्ये सुद्धा सामाजिक दर्जा घटत चाललेला असून स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. त्यामुळे स्त्री जन्माचे स्वागत तर होतच नाही उलट जन्मानंतरही मुलींचे संगोपन योग्य प्रकारे होत नसल्याने स्त्री बालकांचा मृत्युदर वाढला असण्याची शक्यता आहे. आदिवासी विभागात अजूनही दारिद्र्याचे प्रमाण जास्त असल्याने मुलांपेक्षा मुलींच्या संगोपनावर होणारा खर्च खूपच कमी आहे. मुलींचा आहार, आरोग्य व शिक्षणावर होणारा खर्च अत्यल्प आहे. यामुळे**

**कुपोषनासारखी गंभीर समस्या आदिवासी भागात जास्त दिसून येते. कुपोषित बालकांमध्ये सुद्धा मुलींचे प्रमाण लक्षणीय आहे. मुलींच्या संगोपानावर फारसे लक्ष न दिल्याने, मुलींच्या आजारपणात त्यांना योग्य व वेळेत वैद्यकीय सुविधा न पुरविल्यामुळे मुलींचा मृत्युदर जास्त असू शकतो. त्यामुळे आदिवासी बालकांतील लिंग गुणोत्तरात सातत्याने घट होताना दिसून येत आहे. आदिवासी बलाकांतील लिंग गुणोत्तरावरभौगोलिक घटकांबरोबरच सामाजिक व आर्थिक घटकांचा प्रभाव जास्त दिसून येतो. आदिवासी बालकांतील घटणारे लिंग गुणोत्तर थांबवण्यासाठी शासनाकडून योग्य उपाय योजना न केल्यास आदिवासी समाजात व आदिवासी क्षेत्रात गंभीर सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय समस्या निर्माण होऊ शकतात.**

**संदर्भ:**

*Census of India, District Census Handbook Ahmednagar (1991,2001 and 2011)*
*Gill, M. S. (1981): Patterns of Migration in an Underdeveloped Tract: Hissar District of Haryana, 1951-71. Geographical Review of India, 43(2), 105-121.*
*Jain, N. (1998): Tribals in Maharashtra State: A Report. In: Vidyut Joshi (Ed.): Tribal Situation in India, Issues in Development., Rawat Publications, Jaipur, pp. 91-104. Inter India Publication.*
*K. Sita (1986): 'Spatial Pattern of Scheduled Caste Tribes in Maharashtra',The Geographer, vol. 37, Pp 53-59.*
*Lakshmana (2008): 'The Decadal Variation of Child Population Growth in Karnataka State', The Deccan Geographer, Vol. 44, No. 1, Pp. 11-23.*
*Musmade A., More J., Saptarshi P (2011) : A Geographical analysis of sex ratio in Rahuri tahasil of Ahmednagar district., paper Vol. XXVII(2).*
*Narke S. Y. and Kore N. S.(2012): Trend of literacy pattern in Ahmednagar District (Maharashtra), Ultra Scientist, Vol. 24 (1B), pp. 203-209.*
*Nayak D.K.(2010):"A Geographical Perspective on the Patterns of Aging in North-East India with Special Reference to the Tribal areas" in Ramesh Sharma and C. Joshua Thomas (ed) Ageism: Problems and Prospects, Akansha Publishing House, New Dehli, 2009, Pp135-162*
*Roy Kumkum and Yadav Shiva Nand (2008): 'A Study of Demographic Structure of Bijnor District in Utter Pradesh', The Deccan Geographer, Vol. 46, No. 1, Pp. 1-17*
*Singh Deva N. (2006): 'A Study of Demographic Aspects of Scheduled Caste and Scheduled Tribes in Manipur', The Deccan Geographer, Vol. 44, No. 1, Pp. 17-28.*
*Statistical Profile of Scheduled Tribes of India 2013.*
*Zodage S. B. (2008): 'A Study of Sex Ratio in Karvir Taluka in Kolhapur District, Maharashtra State', The Deccan Geographer, Vol. 46, No. 2, Pp. 59-65.*
*www. tribal.nic.in*